PUNE RESEARCH SCHOLAR ISSN 2455-314X
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY JOURNAL VOL 9, ISSUE 2

# शेती, शेतकऱ्यांची दुरावस्था आणि भालचंद्र नेमाडे यांच्या कादंबऱ्या

**सुहास पाटील**
**पी एचडी संशोधक, मराठी विभाग**
**मुंबई विद्यापीठ मुंबई, महाराष्ट्र भारत**

## प्रास्ताविक :-

हिंदुस्तान हा कृषिप्रधान देश आहे. देशाचे अर्थकारण आणि उत्पन्न स्त्रोत आजही शेती आणि शेतकऱ्यावर मोठ्या प्रमाणावर अवलंबून आहे. गेल्या काही वर्षात अनियमित पाऊस, अतिवृष्टी, गारपीट आणि अवकाळी यामुळे कापणीला आलेले पीक शेतकऱ्याच्या हाती येत नाही. बि-बियाणे, खते, कीटकनाशके यांचा वाढीव खर्च, बेभरवशी मजूर वर्ग आणि लहरी हवामान या सगळ्या मुळे शेतकरी त्रस्त आहे. अशा विपरीत परिस्थितीत हातातोंडाशी आलेले पीक नष्ट झाल्यामुळे शेतकरी अजुनच आर्थिक विवंचनेत सापडतो. यामुळे सावकाराकडून शेतीसाठी भरमसाठ व्याजदराने कर्ज घ्यायला लाचार होतो. कर्जाची मुद्दल आणि व्याज वेळेत फेडता न आल्यामुळे, ते फेडण्यासाठी पुन्हा घेतलेले कर्ज. या सर्व गोष्टींमुळे आलेले नैराश्य, आर्थिक अडचणीमुळे कुटुंबात वाढलेले ताणतणाव, वाढलेली व्यसनाधीनता, अचानक उद्भवलेली आजारपणे, यामुळे शेतकरी कुटुंबातील कर्त्या पुरुषाने उचललेले आत्महत्येचे टोकाचे पाऊल, अशा दुष्ट चक्रात शेती आणि शेतकरी सापडला आहे.

मराठी साहित्य विश्वात 'भालचंद्र नेमाडे' हे एक नावाजलेले नाव आहे. शेतकरी कुटुंबात जन्म झाल्यामुळे, शेतीतील कथा-व्यथांचे ते प्रत्यक्ष साक्षीदार आहेत. नेमाडे यांनी आपल्या बहुतेक सर्वच कादंबऱ्यांत आजुबाजूचा

माणूस आणि समाज यांना केंद्रीभूत मानून आपले कादंबरीलेखन केले आहे. नेमाडे यांचे बालपण जळगाव सारख्या कृषीप्रगत जिल्ह्यात गेले आहे. शेतकऱ्यापेक्षा, शेती उत्पन्नाचा व्यापार करणारे व्यापारी, मधील अडते, दलाल जास्त श्रीमंत होताना दिसत आहेत. या समग्र शेती व्यवस्थेचे भले-बुरे चित्रण त्यांच्या कादंबऱ्यांतून आलेले दिसते. आजची शेती आणि तिची दुरावस्था नेमाडे यांच्या कादंबरीतून नेमक्यापणाने कशी प्रतीत झाली आहे याचा आढावा घेण्याचा हा प्रयत्न आहे.

**शेती आणि शेतकऱ्याची दुरावस्था :**

भालचंद्र नेमाडे यांच्या 'कोसला' या कादंबरीत 'पांडुरंग सांगवीकर' या नायकाचा जन्म एका सधन शेतकरी कुटुंबात झाल्याचा उल्लेख येतो. यातील नायकाचा 'बाप' हा भरभक्कम आणि प्रतिष्ठित शेतकरी आहे. शेती आणि शेतीचे उत्पन्न वाढवण्याकडे त्याचा कल आहे, पांडुरंग आपल्या आत्म निवेदनपर कथनातून त्याच्या लहानपणीची गोष्ट सांगतो, "मळयात आम्ही थोडीशी जागा नीट करून तिथे फुलझाडं वगैरे लावली. तर त्यांना हे कळल्यावर ती उपटून टाकून माझा कान पिळत ते म्हणाले, एवढ्या जागेत दहा केळीची खोडं लावली तर पंचवीस रुपये येतील."[१] उपलब्ध शेतजमिनीतील एक इंचही जागा शेतीव्यतिरिक्त कारणासाठी वापरायची नाही अशी ही मानसिकता आहे. 'पांडुरंग' च्या बापाला फुल झाडांपेक्षा नगद उत्पन्न देणारी केळीची खोडे महत्वाची वाटतात. एकूणच शेतकऱ्याला सौंदर्यदृष्टी नसते असे नेमाडे यांचे मत आहे.

'बिढार' ते 'झूल' या कादंबऱ्यांतील नायक 'चांगदेव पाटील' हा देखील शेतकरी कुटुंबातील आहे. त्याचे वडील हे एकत्र कुटुंबातील प्रमुख आहेत. शेतीकडे त्यांचे पुरेसे लक्ष नाही, यामुळेच शेतीतील उत्पन्न कमी झाल्यामुळे कुटुंबकलह वाढून हे एकत्रित कुटुंब दुभंगण्याच्या स्थितीत आहे. शिक्षण आणि नोकरी यामुळे यातील नायक हा परगावी राहत आहे. मध्येच कधीतरी स्वत:च्या मूळ गावी आल्यावर या नायकाला त्यांची शेती आणि तिची खालावलेली परिस्थिति याची कल्पना येते. शेतीच्या आत-बट्ट्याच्या व्यवहारामुळे वडिलांचे आर्थिक नुकसान झाले आहे, मात्र त्यांना शेतीतून उत्पन्न मिळण्याची आस अजूनही आहे. यावेळच्या हंगामात कापूस विकून आपण पुन्हा श्रीमंत होऊ अशा भ्रामक कल्पनेत त्याचे वडील आहेत. यावेळी, "बाबा सोडून द्या हे सर्व, आपण काहीतरी करू" असे दिलासादायक शब्द तो त्याच्या बाबांकडे उद्गारतो. "इतक्या वर्षांत तू काय केलेस ? " असा प्रश्न विचारून चांगदेवचे वडील त्याचा उपहास करतात. चांगदेव नोकरीच्या जागी स्थिर नाही. स्वतच्या भविष्याबाबत त्याला अजुनही

काही भरवसा नाही. वडिलांच्या पडत्या काळात आपण एकुलता एक मुलगा असून देखील काहीही करू शकत नाही ही हतबलता चांगदेव या कथा नायकाद्वारे व्यक्त झाली आहे.

'बिढार' ते 'झूल' या कादंबऱ्यांतून शेती आणि शेतीवास्तव मर्यादित रीतीने व्यक्त झाले आहे. नंतर शेतकरी आणि शेतीची दुरावस्था याचा विस्तृत आढावा भालचंद्र नेमाडे यांनी आपल्या 'हिंदू-जगण्याची समृद्ध अडगळ' या प्रसिद्ध कादंबरीतून घेतला आहे. ही कादंबरी शेतकरी जीवनाशी आणि कृषिसंस्कृतीशी निगडीत आहे. भालचंद्र नेमाडे हे ग्राम व्यवस्थेत 'कुणबी' हा केंद्रबिंदू आहे असे मानतात. त्याच्या अवती-भोवती संपूर्ण गावगाडा फिरत असतो असे त्यांचे मत आहे. नेमाडे यांनी 'हिंदू' या कादंबरीत शेती आणि त्यात येणाऱ्या अनेक अड-अडचणी याचा प्रदीर्घ आढावा घेतला आहे. शेतकऱ्याच्या जीवनातील अडचणी सांगतानाच व्यापारी, दलाल त्यांचा गैरफायदा घेवून कसे शोषण करतात हे नेमाडे यांनी सप्रमाण दाखवून दिले आहे . यातील 'खंडेराव' हा मुख्य नायक, शेती आणि त्यातील प्रश्न यांच्याकडे विवेकशील आणि तारतम्य दृष्ट्या पाहतो. पूर्णपणे निसर्गावर अवलंबून असलेल्या या शेतीत जास्त कष्ट आणि कमी मोबदला, या वास्तवाची जाण येवून तो अभ्यास आणि पीएच.डी. च्या निमित्ताने शेतीपासून दूर जावू इच्छितो. मात्र भावाच्या अपघाती अकाली निधनाने आणि वडिलांच्या वृद्धापकाळाने झालेल्या मृत्यु नंतर हे शेतीचे जोखड आपल्यालाच ओढावे लागणार आहे, तसेच एकुलता एक म्हणून कुटुंब प्रमुखाची भूमिकाही त्यालाच पार पाडावी लागणार आहे, या भावनेने तो चिंतित आहे.

शेती आणि शेतकामामुळे शेतकऱ्याचे संपूर्ण कुटुंब दिवसभर व्यस्त राहते. दिवसरात्र सतत शेतीचाच विचार. शेतकऱ्याबरोबर त्याची बायको, लहान लहान मुलेही शेतकामाला जुंपली जातात. नेमाडे, शेतकऱ्याच्या बायकोपेक्षा मजुराची बायको जास्त सुखी आणि आनंदी असते असे म्हणतात. "मजुराची बायको जास्त सुखात राहाते म्हण की. शेतकऱ्याच्या बाईला घरचं दारचं, शेतशिवारं, पुन्हा येणारे जाणारे, पुन्हा दूध दुभतं, पोरंसोरं ढोरं – केव्हा खाटेला पाठ लागेल असं होतं. दुपारी एक मिनिट लवंडणंसुद्धा होत नै. म्हणून हल्ली पोरींचे बाप शेतकऱ्याला देऊन नि राहाले. पोरी – त्यापेक्षा पानटपरीवाला बरा म्हंता ते. निदान बाईला सुख असतं."[२] शेतकरी कुटुंबात जर आपल्या मुलीचे लग्न लावून दिले तर आपल्या मुलीला खूप काबाडकष्ट उपसायला लागतील, या भावनेनेने शेतकऱ्याच्या मुलाला लग्नासाठी मुलगी द्यायला कोणीही तयार होत नाही. या एका वेगळ्या समस्येचा उच्चार नेमाडे करतात.

खंडेरावच्या 'सुधी' या विधवा मावशीने देखील या शेती आणि शेतकऱ्याची फरफट पाहिली आहे. पदरात दोन मुली असलेली ही मावशी खंडेरावच्या वडिलांना म्हणजे विठ्ठल रावांना आपल्या मुलीबाबत शेतीबाहेरचे

स्थळच पाहा असा आग्रह धरते, ती म्हणते, “खेडी म्हणजे शेती, शेती म्हणजे थंडी, ऊन, धूळ आणि काबाडकष्ट, नकोरे भाऊ विठ्ठल, कितीही हुंडा लागो, मला जावई शहरातलाच बघ. मी मरेपर्यंत तुझ्या दारी मजुरी करून फेडून टाकीन”[३].

शेतीच्या कामातून लहान लहान शाळकरी मुलेही सुटत नाहीत. शेतकऱ्या बरोबर या लहान मुलांनाही अभ्यास बाजूला ठेवून शेतकामाला हातभार लावावाच लागतो. ‘हिंदू’ कादंबरीतील नायक खंडेराव याबाबत आपला त्रागा व्यक्त करताना म्हणतो. शेतकऱ्यांची मुले म्हणजे लहान लहान चक्रच, मोठ्या चक्रा कडून सतत फिरवली गेलेली. नेमाडे शेतकऱ्याचा शेती व्यतिरिक्त ज्ञानाचा काही संबंध नाही असे मत व्यक्त करतो. नेमाडे हे ग्रामीण परिस्थितीचे वर्णन करताना ‘खंडेराव’ या पात्राद्वारे म्हणतात, “इकडे खेड्यात शेतकऱ्यांच्या संस्कृतीत काय ज्ञानाच्या गोष्टी शक्य आहेत? जे अभिरांचं झालं, तेच आजच्या शेती संस्कृतीवाल्यांचं होईल. ज्ञानाचं इकडे काही खरं नाही. दिवसभर म्हशी गोठ्यातून ओरडत असतात, गुरांचा चारापाणी करण्यातच अर्धा दिवस जातो. अजिबात वचन सुद्धा करता येत नाही, चिंतन मनन आणखी कठीण. लिहिणं तर अशक्यच. शेती दिवसेंदिवस व्यापारी होत चालली आहे. कॅश क्रॉप. आजच्या शेतकऱ्यापेक्षा जंगलातले रानटी लोक काहीतरी संस्कृती सांभाळतात. ज्ञान आणि कला तर ह्या ग्रामीण संस्कृतीत शत्रूच वाटतात. ज्ञाना बद्दल आहे ती आस्थाही इथे जपता येत नाही”[४]

मोठया शेतकऱ्यावर म्हणजे जास्त जमीन असलेल्या वतनदारावर, गावातील अलूते-बलुते आणि त्यांची कुटुंबे अवलंबून असतात. त्यांच्या तोरणा-मरणाला, अडीनडीला, खेड्यातील या प्रस्थपित, मोठ्या शेतकऱ्यांनी मदत करायलाच हवी अशी धारणा असलेली ही लोकं. हेच अलूते-बलुते, गडी सुगीच्या दिवसात वाढीव मजुरीकरता शेतकऱ्याला नाडतात. कापणीच्या वेळी काहीतरी थातुर-मातूर कारणे सांगून कामावर येत नाहीत. त्यांना काही बोल लावला तर चोरी-मारी करून पिकाचे नुकसान करतात. एकूणच व्यापारी-दलाल या लोकांबरोबर ही लोकं देखील शेतकऱ्याची पदोपदी अडवणूक करतात. अशा मजूर वर्गाला जपायलाच हवे, असा पोक्त सल्ला शेतीत जास्त दिवस काढलेली विठ्ठलरावांची आई सीता बाई त्यांना देते. “सोप असतं का इठू दारचा कारू टाकणं ? महाराशी तं कद्धीसुद्धा वाकडं घेऊ नये. बेटा. परवा त्या कान्हा पाटलाच्या खळयात आग लागली, पाह्यली नं? चारा गेला, ढोरं बिचारी दावी, थानी थानी आगीत भुजाले नं मेले. केवढं नुकसान झालं? असं व्हतं. गाव गाडयात कोन्हाचं नाव घेता येतं का? कुनब्याच्या तं पसारा केवढा असतो. सात ठिकाणी मळे मळे रानं गुरं ढोरं दुभत्या म्हशी गायी गंजी – कुठे हंगामात

उभी पिकं खुडुन नेली, केळीचं तान्हे घड कापले – हजारांच नुकसान होतं. म्हशीले बैलाले ईख खवडी देलं – काय करसान? आहे तसं गोडी गुलाबीनं चालू देववं." ५

याद्वारे शेतकरी, घरी काम करणारे मजूर, गडी, मजूर आणि घरचा महार यांचे परस्परावलंबन नेमाडे आपल्याला दाखवून देतात.

नेमाडे, शेती हा अतिशय बेभरवशाचा आणि निसर्गाच्या लहरीवर चालणारा व्यवसाय आहे असे म्हणतात. शेतीतून मिळणारे अल्प उत्पन्न आणि त्यातील अपरिमित कष्ट याचे व्यस्त प्रमाण यामुळे शेतकरी कधीही सुखी होत नाही. 'शेतीका धंदा और हात गंदा' अशी त्यांची भावना आहे.

शेषराव मोहिते हे जेष्ठ लेखक आणि कृषिविषयक अभ्यासक 'हिंदू' कादंबरी बाबत आपले मनोगत व्यक्त करताना म्हणतात, की यातील नायक हा पुरातत्व शाखेचा विद्यार्थी आहे, परंतु तो कृषी संस्कृतीत मोठा झाला आहे. यामुळे त्याचे शोध काम हे, "... गाडल्या गेलेल्या कृषिसंस्कृतीचा शोध घेणे, तेव्हाच्या अस्तित्वात असणाऱ्या लिपीचा अर्थ लावणे, मुद्रांचा अर्थ लावणे, एकेका चित्राच्या, चिन्हांच्या मागची संकल्पना समजून घेऊन त्यांचा आजच्या वर्तमान कृषिसंस्कृतीशी संबंध प्रस्थापित करणे. श्रमाला केंद्रस्थानी ठेवून नैसर्गिक पिकांनी पृथ्वीची शान वाढवणारी आत्ममग्न, स्वायत्त कृषिसंस्कृती हळुहळू परावलंबी कशी होत गेली आणि आज पराभवाच्या गर्तेत येऊन कशी सापडली ते समजून घेणे. इतकी दहा हजार वर्षापासूनची समृद्ध कृषि परंपरा जगात कोणाच्याही वाट्याला आली नाही, हे जागतिक व्यासपीठवर अभिमानाने सिद्ध करणे हे खंडेरावचे जीवित कार्य तर आहेच; पण त्याचवेळी आजचे खेडे, त्याची दुरावस्था, शेतीला आलेली अवकळा, तिची झालेली दुरावस्था मांडणे हे देखील खंडेरावचे जीवित कार्य आहे." ६ असे मत मांडतात. शेषराव मोहिते 'हिंदू' कादंबरीत चित्रित झालेली कृषिव्यवस्था आणि सद्य स्थितितील शेती याची तुलना करून ही कादंबरी 'कृषी संस्कृतीच्या पराभवाची गाथा आहे' असे प्रतिपादन करतात.

नेमाडे हे स्त्रीचा आदर करणारे व्यक्तिमत्व आहे. स्त्रियांविषयीचा कनवाळूपणा त्यांच्या लेखनातून सतत व्यक्त होत राहतो. शेतकऱ्याच्या बायकांना किती कष्ट करावे लागतात याची यथोचित जाण त्यांना आहे. नुस्त्या लग्नाच्या परम मंगल विधिंमुळे आयुष्यभराची मजुरीण घरात आणता येते, अशी उपहासात्मक टिप्पणी खंडेराव या पात्राद्वारे नेमाडे करतात.

भालचंद्र नेमाडे 'हिंदू' कादंबरीत एक अजून मुद्दा मांडतात, डॉ. बाबासाहेबांच्या शिकवणीमुळे गाव खेड्यातील बारा बलुतेदारांनी आपला मूळचा व्यवसाय सोडला आणि धर्म बदलून 'बौद्ध' धर्माचा आसरा घेतला.

खेड्यातील शेतकऱ्यांना काम करायला मजूर न मिळाल्यामुळे त्यांची कुचंबणा होऊ लागली. त्याबाबतीत चीड व्यक्त करताना, खेड्यातील शेतकरी, गावकी सोडल्यापासून 'नवबौद्ध' असे झाटमारी धंदे करायला लागले असे तुच्छतेने म्हणतात. खंडेराव गावातील शेण गोळा करण्यापेक्षा दारू विकणे चांगले असे मत मांडतो. यामुळे चिडून गावकरी 'खंडेराव' शिकून वाया गेला असे मत प्रदर्शित करतात.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या आवाहनाला प्रतिसाद देवून जे नवबौद्ध गाव सोडून शहराकडे आले त्यांच्या पुढच्या पिढीने शिकून प्रगती केली. आज हीच लोकं शासन दरबारी तसेच मोठ्या मोठ्या कंपन्यांमध्ये उच्च पदावर कार्यरत आहेत. शेती आणि तिच्याशी संलग्न व्यवसाय सोडल्याने आणि गाव सोडल्यामुळेच हे लोक इतकी प्रगती करू शकले असे स्पष्ट प्रतिपादन नेमाडे करतात.

आज हिंदुस्थानातील शेतीची काय परिस्थिती आहे? इतर देश, वेगवेगळी उत्तम जातीची बी-बियाणे, प्रगत तंत्रज्ञान वापरुन, निसर्गावर पूर्णत: अवलंबून न राहता नव-नवीन प्रयोग करत शेतीतून आपले उत्पन्न वाढवीत आहेत, तर भारतातील बहुतांश शेतकरी आजही निसर्गावर अवलंबून आहे. सरकार शेतकऱ्याच्या भल्यासाठी वेगवेगळया योजना जाहीर करते, परंतु त्या शेवटच्या शेतकऱ्यापर्यन्त पोहचत नाहीत. अवर्षण, अतिवृष्टी, अवकाळी पाऊस, वादळे, गारपीट झाली की राज्यकर्ते शेतकऱ्यांना मदत जाहीर करतात. परंतु ती मदत योग्य वेळेत शेतकऱ्या पर्यंत पोहचत नाही. शेती आणि तिच्यावर उपजीविका करणे दिवसेंदिवस दुरापास्त होत आहे, असे वाटते.

एका सांख्यकीय पाहणी नुसार शेतीतील अपयश आणि कर्जबाजारीपणामुळे महाराष्ट्रातील विदर्भ आणि इतर दुष्काळी जिल्ह्यातलील अनेक शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या, याबाबत खंत व्यक्त करताना, सुखदेव काळे हे जेष्ठ लेखक, आपल्या 'शेतीच्या उद्ध्वस्तीकरणाची सर्वव्यापी सुन्न जाणीव...' या लेखात, "गेल्या दहा वर्षात सव्वा दोन लाख शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. शेती अर्थव्यवस्थेचे प्रचंड उद्ध्वस्तीकरण सर्वव्यापक होत असताना नकाराश्रू ढाळण्या पलीकडे तथाकथित मध्यम वर्गाने काही केल्याचे दिसत नाही. त्याची खंतही या वर्गात दिसत नाही. 'हिंदू', हे उद्ध्वस्तीकरण कोणकोणत्या अंगांनी कसे कसे झाले, याचा खोलात जाऊन घेतलेला लेखाजोखा वाचकांपर्यंत मांडण्याचा प्रयत्न करते."[७]

एका सांख्यकीय पाहणीनुसार फक्त २०२२ साली विदर्भातील जवळजवळ १८७५ लोकांनी आत्महत्या केल्या अशी ही सांख्यकी सांगते. तत्कालीन राज्यकर्ते-शासन आत्महत्या केलेल्या व्यक्तिच्या कुटुंबीयांना मदत जाहीर

करते पण ती योग्य वेळेत त्या कुटुंबीयांना मिळेल की नाही याची शाश्वती देत नाही. पुन्हा ही मदत मृत व्यक्तीच्या बायकोला द्यावी की आई-वडिलांना, यातून एक वेगळ्याच सामाजिक प्रश्नाची निर्मिती होते.

खंडेराव या नायकाला गावातील इतर शेतकरी आणि निसर्गाच्या लहरी चक्रामुळे त्यांच्या आयुष्यात येणारे चढउतार पाहून संभ्रमित व्हायला होते. कशीही परिस्थिती असली तरी त्याच्या वडिलांची समृद्धी नेहमी कायम कशी राहते, याचे त्याला कोडे आहे. आजुबाजूचे सर्वच शेतकरी त्यांच्या कुटुंबासकट शेतात राबत राहतात, तरीसुद्धा त्यांच्या परिस्थितीत काहीही फरक पडलेला दिसत नाही. या परिस्थितीला ही जीवघेणी शेतीच कारणीभूत आहे असे खंडेरावला वाटते.

**समारोप :-**

प्रस्तुत लेखाचा समारोप करताना असे नमूद करावेसे वाटते की आपला देश बहुतांशरित्या अजुनही आर्थिक दृष्ट्या कृषी आणि कृषिव्यवस्थेवरच अवलंबून आहे. भालचंद्र नेमाडे यांच्या कादंबऱ्यांतून शेतीचे अतिशय दाहक आणि विदारक वर्णन आले आहे. हे शेतीवास्तव बऱ्याच अंशी सत्य असले तरी त्यातून शेतीच्या भवितव्याबाबत प्रकट होणारे चित्र मर्यादित विचारसरणी दर्शवते, तसेच ते नकारात्मक आणि एकांगी वाटते. शेती म्हणजे अपरिमित कष्ट, सर्वत्र अंधार, या नेमाडेंच्या मांडणीतून संभाव्य धोके दिसतात. ज्यावेळेस नेमाडे सरांनी लिखाण केले त्या वेळेस जीवसृष्टीआणि पर्यावरणाची परिस्थिती तेवढी खालावलेली नव्हती तसेच त्या बाबत जागृतीचा अभाव होता हि वस्तुस्थिती मान्य करूनही काही प्रश्न उद्भवतात. आज बेसुमार जंगलतोड, बेबंद औद्योगिकरण आणि बेसुमार शहरीकरण, सर्वत्र नवीन वसाहती वाढत असल्यामुळे वाढलेले कॉंक्रीटीकरण यामुळे निसर्गाचा समतोल ढासळलेला आहे. त्यामुळे अति उष्णतामान, अवकाळी पाऊस, गारपीट, प्रदूषण असे अक्राळविक्राळ प्रश्न निर्माण होऊन शेतकऱ्याचे अपरिमित नुकसान होत आहे, हे सर्वमान्य वास्तव आहे. मग अशा विपरीत परिस्थितीत नेमाडे यांच्या पात्रांद्वारे मांडलेल्या मतानुसार जर सर्वजण शेती सोडून इतर व्यवसायात उतरले तर त्यातून इतर अनेक भीषण प्रश्न उभे राहतील. शेतीतून निघून शहराकडे आलेल्या लोंढ्यामुळे बेधुंद शहरीकरण वाढेल, शहराचे बकालीकरणात भर पडेल. शेती कडे दुर्लक्ष केल्यास भविष्यात अन्न धान्याच्या तुटवडा निर्माण होईल. अन्नधान्यासाठी इतर देशांवर अवलंबून राहावे लागेल. परकीय गंगाजळी आटून एकंदरीत अर्थ व्यवस्थेवर ताण येईल. हरितक्रांती नंतर शेतीत आपला देश हळुहळू स्वयंभू आणि आत्मनिर्भर होत आहे. शेती अन्न धान्याच्या क्षेत्रात आपला देश पूर्ण जगात महासत्ता. तसेच कृषी संदर्भात जास्तीत जास्त संशोधन करून, शेती तज्ञांच्या मदतीने सामान्य शेतकरी तरुण

PUNE RESEARCH SCHOLAR ISSN 2455-314X
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY JOURNAL VOL 9, ISSUE 2

वर्गाला शेतीसाठी प्रोत्साहित केले, त्याचप्रमाणे तंत्रशुद्धरित्या जास्तीस्त जास्त जमीन लागवडीखाली आणली तर शेतीचे पर्यायाने एकूणच देशाचे आर्थिक उत्पन्न वाढून त्यातून आर्थिक सुबत्ता निर्माण होईल. माणसाचे व्यक्तीगत जीवनमान उंचावेल. जास्तीत जास्त जमीन शेती खाली आल्यास पर्यावरणाचा प्रश्नही इतका बिकट राहणार नाही. शेती व्यवसायाकडे अधिकाधिक लोक वळल्यामुळे व्यक्तीगत तसेच सामूहिक आर्थिक उत्पन्न वाढेल. आपला देश शेती बाबत आत्मनिर्भर होवून प्रगतीकडे वाटचाल करून 'हिंदुस्थान' एक महान कृषिसत्ता होईल.

एकंदरीतच सर्वांगीण विचार केला तर कृषि संस्कृती बाबतची नेमाडे यांची मते जशीच्या तशी न स्वीकारता त्याकडे सकारात्मक टीका म्हणून पाहणे आवश्यक ठरेल. शेती वाऱ्यावर सोडून न देता त्यात सुधारणा घडवून आणण्यासाठी पर्यावरणपूरक असे धोरणात्मक निर्णय घेवून ते चिकाटीने राबवणे असा सकारात्मक आणि विधायक दृष्टीकोन हिंदुस्थांनाच्या आणि एकंदरीत जीवसृष्टीच्या संवर्धन आणि विकासाकारिता अनमोल ठरेल, असे लेखाचा शेवट करताना नमूद करावेसे वाटते.

### संदर्भसूची :

१. नेमाडे भालचंद्र, 'कोसला', पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, अकरावे पुनर्मुद्रण, जानेवारी २०२०, पृ. ४
२. नेमाडे भालचंद्र, 'हिंदू-जगण्याची समृद्ध अडगळ', पॉप्युलर प्रकाशन, पहिली आवृत्ती, जुलै २०१०, पृ.४१०
३. नेमाडे भालचंद्र, 'हिंदू-जगण्याची समृद्ध अडगळ', पॉप्युलर प्रकाशन, पहिली आवृत्ती, जुलै २०१०, पृ.२४९
४. नेमाडे भालचंद्र, 'हिंदू-जगण्याची समृद्ध अडगळ', पॉप्युलर प्रकाशन, पहिली आवृत्ती, जुलै २०१०, पृ.४२६
५. नेमाडे भालचंद्र, 'हिंदू-जगण्याची समृद्ध अडगळ', पॉप्युलर प्रकाशन, पहिली आवृत्ती, जुलै २०१०, पृ.१६६
६. मोहिते शेषराव, (लेख) 'हिंदू : कृषी संस्कृतीच्या पराभवाची गाथा', हिंदू समृद्धी की अडगळ', संपादन - कसाळे दिपक, जायभाये अनिल, देसाई प्रभाकर, घारुळे बालाजी - हरिती प्रकाशन - जून २०१६, पृ. २१९
७. काळे सुखदेव, (लेख) 'शेतीच्या उद्ध्वस्तीकरणाची सर्वव्यापी सुन्न जाणीव', हिंदू समृद्धी की अडगळ', संपादन - कसाळे दिपक, जायभाये अनिल, देसाई प्रभाकर, घारुळे बालाजी - हरिती प्रकाशन - जून २०१६, पृ. २२७-२२८